# जीओएलआयएलची मुकुल माधव फाउंडेशनसोबत भागिदारी




'अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थे'च्या विशेष मुलांसाठी पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

● पुणे । प्रतिनिधी

गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेड (जीओएलआयएल)ने, फिनोलेक्स इंडस्ट्री लिमिटेडचा हा सीएसआर प्रकल्प असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनबरोबर भागीदारी केली आहे, याअंतर्गत 'अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थे'च्या विशेष मुलांसाठी पुणेस्थित आयपीएल फ्रांचाइजीच्या राइजिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्टीव्हन स्मिथ, फाफ दु प्लेसिस आणि जयदेव उनाडकत हे टीमचे खेळाडू यासाठी उपस्थित होते. तसेच ते एनजीओच्या ३० मुलांबरोबरच्या धमाल कार्यक्रमात सहभागीही झाले होते. क्रिकेटपटूंबरोबर प्रत्यक्ष खेळण्याची संधीही त्यांना उपलब्ध झाली.

मुलांमधील स्वप्ने फुलावीत, यासाठी हा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यासाठी धकाधकीच्या वेळापत्रकातून खेळाडूंनी वेळ काढला होता. आपल्या आवडत्या खेळाडूंना भेटण्यासाठी मुले अतिशय उत्सुक होती.